दिनांक :– १९.०१.२०२१

**प्रेसनोट**

लोकसेवक श्री भगवंत प्रशांत कपाळे, वय ४१ वर्ष, (सहाय्यक लेखाधिकारी) प्रभारी अधिक्षक (वर्ग २), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, हिंगोली रा.आनंद नगर, हिंगोली यांनी ५,०००/–रू. ची लाच स्विकारल्यावरून त्यांना ताब्यात घेतले बाबत...

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक ११.०१.२०२१ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे माहे जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१८ या कालावधीने सातव्या वेतन आयोगाच्या पहिल्या हप्त्याने १,४९,४८१/–रूपये रकमेचे थकीत देयकाची छाननी करून शिक्षण अधिकारी यांची सही घेवून वेतन देयके मंजुरी करीता शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद येथे पाठविण्यासाठी लोकवसेवक भगवंत प्रशांत कपाळे (सहाय्यक लेखाधिकारी) प्रभारी अधिक्षक (वर्ग २), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, हिंगोली हे ५०००/– रू यांची लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक ११.०१.२०२१, दिनांक १२.०१.२०२१, दिनांक १३.०१.२०२१ व दिनांक १९.०१.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक भगवंत प्रशांत कपाळे (सहाय्यक लेखाधिकारी) प्रभारी अधिक्षक (वर्ग २), वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, हिंगोली यांनी तक्रारदार यांना ५,०००/– रू. ची लाचेची मागणी केली. त्यावरून दिनांक १९.०१.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक भगवत प्रशांत कपाळे, प्रभारी अधिक्षक (सहाय्यक लेखाधिकारी) यांनी अधिक्षक कार्यालय वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, हिंगोली चे कार्यालयात तक्रारदार यांचे कडून १३.५७ वाजताचे सुमारास लाचेची रक्कम स्विकारली. त्यावरून लोकसेवक भगवंत प्रशांत कपाळे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, प्र.पोलीस उपअधीक्षक श्री नितीन देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती ममता अफुने, पोलीस निरीक्षक सपोउपनि माधव बुरकुले, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना महारूद्रा कवाडे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री तान्हाजी मुंढे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, पोशि प्रमोद थोरात चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.–१०६४, दुरध्वनी क.०२४५६–२२३०५५,**

**मोबाईल कमांक :–** ९९२३०४२५६५, ८३९०७६१५०३

Scanned by CamScanner